# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- ०९/१०/२०१८

## नाशिक ग्रामीण पोलीसांचे जिल्हयात कोंम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी ऑलआउट स्किम

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली दिनांक ०८/१०/२०१८ रोजी जिल्हयात अचानक कोम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी ऑलआउट स्किम प्रभावी व परिणामकारकपणे राबविण्यात आली. सदर कारवाईत वरिष्ठ अधिका-यांपासुन ते पोलीस कर्मचा-यापर्यंत सर्वच स्टाफने रस्त्यांवर येवुन सक्त व सशस्त्र गस्त घालुन कारवाई केली आहे.

**मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त कर्मचारी नेमुन कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे जिल्हयात कोम्बींग ऑपरेशन व नाकाबंदी दरम्यान मालाविरूध्दचे गुन्हे - दरोडा, जबरीचोरी, घरफाडी, चोरी यांमधील रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे व फरार असलेले आरोपी, हिस्ट्रीशीटर यांना चेक करण्यात येवुन सी. आर.पी.सी. व मुं.पो.कायदयान्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच नाकाबंदी दरम्यान संशयीत व विना नंबरची मोटर वाहने, भरधाव वेगाने व दारू पिउन वाहन चालविणारे, तसेच सार्वजनिक ठिकाणी, मुख्य चौकात विनाकारण हुल्लडबाजी करणारे इसमांवर कारवाई करण्यात आली. महामार्ग व मुख्य रस्त्यांवरील हॉटेल, ढाबे चेक करून रात्री उशिरापर्यंत सुरू असलेले हॉटेल व ढाबे मालकांवर मुंबई पोलीस कायदयान्वये कारवाई करण्यात आली आहे. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील मुख्य रस्ते, बाजार पेठ, सराफ बाजार, बॅंक व ए.टी.एम., धार्मिक स्थळे, रेल्वे व बसस्थानक, टोल नाके अशा अनेक ठिकाणांवर सशस्त्र पेट्रोलिंग करून संशयीत इसमांना चेक करण्यात येवुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

दरम्यान लासलगाव पोलीस ठाणे हद्दीत विंचुर त्रिफुली परिसरात सहा.पोलीस निरीक्षक श्री. शिवचरण पांढरे हे त्यांचे पथकासह नाकाबंदी लावुन संशयीत वाहने चेक करत असतांना, इसम नामे **१) रविंद्र वसंत बेलेकर,** वय २०, रा. विंचुर, ता.निफाड, **२) गोरख पुंडलिक कदम,** वय २२, रा. सोमठाना, ता.येवला, **३) वाल्मिक भाउसाहेब पिंपरकर,** वय २८, रा. सोमठाना, ता.येवला यांना पाठलाग करून शिताफिने ताब्यात घेतले, त्यांचे कब्जातुन विना नंबरच्या ०१ हिरो आयस्मार्ट, ०१ बजाज पल्सर, व ०१ हिरो शाईन अशा **०३ मोटर सायकल जप्त** करण्यात आल्या असुन सदर आरोपीतांनी सटाणा, नांदगाव तसेच वैजापुर,ता.औरंगाबाद येथुन सदर मोटर सायकली चोरी केल्याची कबुली दिली आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांनी कबुली दिलेवरून वैजापुर पो.स्टे,जि.औरंगाबाद, तसेच सटाणा व नांदगाव पोलीस ठाणेस दाखल असलेले **मोटर सायकल चोरीचे ०३ गुन्हे उघडकीस** आलेले आहे.

नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन व ऑलआउट स्किम दरम्यान केलेल्या कारवाईत जिल्हयातील मालाविरूध्दचे गुन्हयातील एकुण ५२ रेकॉर्डवरील गुन्हेगार व हिस्ट्रीशीटर यांना चेक करण्यात येवुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. तसेच बेदरकारपणे वाहन चालविणारे, विना नंबरची वाहन वापरणारे, ड्रंक अॅण्ड ड्राईव्ह करणारे असे एकुण १२४७ वाहने चेक करण्यात आली व मोटर वाहन कायदयान्वये एकुण २८३ केसेस करून ५४,०००/- रू. चा दंड वसुल करण्यात आला आहे. अवैधरित्या दारूविक्री करणारे व गावठी दारू तयार करणारे इसमांवर छापे टाकुन मुंबई दारूबंदी कायदयान्वये एकुण ३३ केसेस करण्यात आल्या असुन ४८,००७ रू. चा मद्देमाल हस्तगत करण्यात आला, तसेच मुंबई जुगार कायदयान्वये ०३ केसेस दाखल करण्यात आलेल्या आहे. महामार्गावर रात्री उशिरा पर्यंत हॉटेल / ढाबे सुरू ठेवणारे हॉटेल / ढाबे मालकांवरही सदर स्किम दरम्यान कारवाई करण्यात आली आहे. तसेच मा. न्यालयांकडुन प्राप्त झालेले एकुण १४५ समन्स, २७ बेलेबल वॉरंट व ३७ नॉन बेलेबल वॉरंटची सदर मोहिमेदरम्यान बजावणी करण्यात आली आहे.

**मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांचे आदेशान्वये आगामी काळात साजरे होणारे सण उत्सवाचे अनुषंगाने जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था परिस्थितीवर नियंत्रण, मालाविरूध्दचे गुन्हयांना प्रतिबंध व गुन्हेगारांवर वचक ठेवण्यासाठी यापुढेही अशाच प्रकारे ऑलआउट स्किम, नाकाबंदी, कोम्बींग ऑपरेशन सतत राबविण्यात येणार आहे.